## ५. समकालीन भारत: सुशासन


**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**(१) लोकपाल ही संकल्पना येथून घेण्यात आली.**
(अ) अमेरिका
(ब) युनायटेड किंग्डम
**(क) स्वीडन**
(ड) रशिया

**(२) नागरिकाची सनद ही संकल्पना याचा भाग आहे -**
(अ) POSDCORB
(ब) विकास प्रशासन
**(क) सुशासन**
(ड) बिगर सरकारी उपक्रम

**(ब) योग्य संकल्पना सुचवा.**
**शासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधातील तक्रारींची चौकशी करणारी व्यक्ती-**
**उत्तरे**: लोकपाल/लोकायुक्त

**प्र२(अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**
**(Rotate your phone)**




**सुशासनाची मूल्ये**
परिणामकारकता आणि कार्यक्षमता
पारदर्शकता
समावेशकता
सहभागात्मक
सहमती दर्शक
कायद्याचे राज्य
उत्तरदायित्व
प्रतिसादात्मक

**(ब) चूक की बरोबर सकार लिहा**.

**(१) राजकीय कार्यकारी प्रमुखांविरोधात लोकायुक्त चौकशी करू शकतात.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारणे:** (१) ते शासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाची चौकशी करतात.
(२) राज्यपालाविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करण्याचा अधिकार त्यांना नाही.

**(२) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.
**कारण:** सुशासनात समाविष्ट परिणामकारकता आणि कार्यक्षमता या तत्त्वात ही कृती समाविष्ट आहे.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

**(१) सुशासन आणि ई-प्रशासन.**
**उत्तर:** (१) सुशासन आणि ई-प्रशासन यांचे संबंध घनिष्ठ आहेत.
(२) माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत नागरिकांना जलदपणे माहिती उपलब्ध होते.
(३) नागरिकांच्या तक्रारीची दखल शासनाला त्वरित घ्यावी लागते आणि त्यासाठीचे निर्णय त्वरेने आणि न्यायपूर्वक घ्यावे लागतात.
(४) प्रशासनात पारदर्शकता येऊन शासनाचे नागरिकांप्रती उत्तरदायित्व प्रस्थापित होते.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

**(१) ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया जलद झाली.**
**उत्तर :** ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया जलद झाली आहे. या विधानाशी मी सहमत आहे.
**कारणे :** (१) यंत्रणेद्वारे माहितीची साठवण करणे शक्य झाले आहे.
(२) गरज असेल तेव्हा ती माहिती विनाविलंब उपलव्य होते.
(३) माहितीच्या उपलब्धतेमुळे शासकीय निर्णय प्रक्रियेत होणारा विलंब टाळता येतो.
(४) शासनाचे नागरिकांप्रती असणारे उत्तरदायित्व आणि पारदर्शक कारभार ई-प्रशासनामुळे प्रस्थापित होतात.

**(२) ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे.**
**उत्तर :** ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे, या विधानाशी मी सहमत आहे.
**कारणे :** (१) ई-प्रशासनाच्या आधी तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी नागरिकांना तालुक्याच्या/जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे.
(२) ई-प्रशासनामुळे स्वहस्ते माहितीची मागणी राहत असलेल्या ठिकाणाहून करता येते.
(३) शासकीय अधिकाऱ्यांना जनतेच्या तक्रारींची विनाविलंब दखल घ्यावी लागते आणि विविध निर्णय घ्यावे लागतात. अशा प्रकारे ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे.

**प्र.५ उत्तर लिहा.**

**(१) समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या भारतातील विविध संस्था स्पष्ट करा.**
**उत्तर:** शासनाने समाजातील विविध घटकांचे हक्क जपण्याच्या दृष्टीने पुढील संस्थांची निर्मिती केली आहे :
**(१) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग:** भारतीय संविधानाने स्थापन केलेला हा आयोग अनुसूचित जातींसाठीच्या संवैधानिक संरक्षक उपाययोजनांच्या संदर्भात काम करतो.
**(२) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग:** भारताच्या संविधानाने स्थापन केलेला हा आयोग संविधानाने हमी दिलेल्या संरक्षक उपाययोजनांच्या संदर्भात काम करतो.
**(३) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग**: संविधानाने हमी दिलेल्या जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समता आणि प्रतिष्ठेच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी सदर आयोग काम करतो.
**(४) राष्ट्रीय महिला आयोग:** महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सदर आयोगाची स्थापना करण्यात आली. महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासास चालना देण्याचे कार्य आयोग करतो.
**(५) राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग:** बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, बालहक्कांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचा बचाव करणे यासाठी हा आयोग कार्यरत असतो,
**(६) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग:** सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या कल्याणावर हा आयोग भर देतो.
**(७) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग:** अल्पसंख्यांकांचे संरक्षण करण्यासाठी संसद आणि राज्यांच्या विधिमंडळांनी पारित केलेले कायदे आणि संविधानाने दिलेल्या संरक्षण विषयक तरतुदींचा कार्यावर देखरेख करण्याचे काम हा आयोग करतो.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**
**सुशासनाची पुढे दिलेली मूल्ये सविस्तरपणे स्पष्ट करा.**
**(अ) सहभागात्मक (ब) पारदर्शकता (क) प्रतिसादात्मक (ड) उत्तरदायित्व**

**उत्तर:** सुशासनाची मूल्ये पुढीलप्रमाणे आहेत :

(**अ) सहभागात्मक:** लोकशाही व्यवस्थेच्या परिणामकारक कार्यासाठी लोकसहभाग आवश्यक असतो. जनतेचे विचार आणि मागण्या शासनापर्यंत पोहोचवल्या जातात. शासकीय निर्णय प्रक्रियेत आणि त्यांच्या कार्यवाहीत लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेणे.

**(ब) पारदर्शकता:** पारदर्शकता या मूल्यामुळे शासकीय कामावर लक्ष ठेवणे लोकांना शक्य झाले आहे. २००५ च्या माहितीचा अधिकार कायद्यामुळे नागरिकांना शासकीय कामकाजाविषयी माहिती प्राप्त करणे शक्य झाले आहे.

**(क) प्रतिसादात्मक:** सुशासनामध्ये विविध संस्थांमार्फत आणि प्रक्रियांमध्ये सर्व भागधारकांना ठरावीक कालमर्यादेत सेवा देणे आवश्यक आहे. नागरिकांच्या समस्या आणि प्रश्नांबाबतीत शासन संस्थेने त्वरित निर्णय घेणे आणि त्याद्वारा जनतेच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे.

(**ड) उत्तरदायित्व:**सुशासनात जनतेप्रती उत्तरदायित्व या संकल्पनेला महत्त्व आहे. निर्णय कोणी घेतले किंवा कार्यवाही कोणी केली आणि घेतलेले निर्णय संस्थांतर्गत घेतले की बायघटकांनी यावर कोण कोणाला उत्तरदायी आहे हे अवलंबून असते. एकूणच कोणतीही संस्था ही तिच्या निर्णयांसाठी जबाबदार असते. ज्यांच्यावर उत्तरदायित्व साठी पारदर्शकता आणि कायद्याचे राज्य असण्याची गरज असते.